# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४२–०९/ दिनांक :

निवास स्पिनींग मिल्स लि. अर्जदार
४०६ अ, पश्चिम मंगळवार पेठ,
चाटी गल्ली, सोलापूर – ४१३ ००२

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, ऊर्जा नगर, सोलापूर विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभाग, सोलापूर

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण १ उप विभागीय कार्यालय, सोलापूर

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे                दिनांक : ०१.०७.२००९

अर्जदाराचा दिनांक १९.०६.२००९ कडील अर्ज या कार्यालयास दि. २०.६.२००९ रोजी प्राप्त झाला. सदरचा अर्ज हा अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दाखल करुन या मंचाकडेही अर्जदाराने दाखल केलेला आहे. कारण त्यांचे म्हणणे की, वि.प.तर्फे दि. १६.६.२००९ रोजी नोटीस देण्यात आली की, दिनांक ३०.४.२००८ रोजी दिलेल्या मागणी बीलाप्रमाणे त्यांचेकडे येणे असलेली सुरक्षा ठेव रु. ४,१८,६००/– व त्यावरील होणारे व्याज अशी एकूण रक्कम रु. ६,४२,५०७/– न भरल्यास त्यांचा विद्युत पुरवठा बंद करण्यात येईल. परिणामी, अशा कारणासाठी अर्जदार या मंचाकडे तक्रार अर्ज घेवून आलेले आहेत व त्यामध्ये अंतरिम मनाई आदेश मागितला आहे. रेग्युलेशन मधील तरतुदीप्रमाणे असा अर्ज व त्या वरील अंतरिम आदेशा बाबत या मंचास विचार करण्याचा अधिकार पोहोचतो. त्याप्रमाणे सुरुवातीस दिलेल्या अर्जामध्ये सदर सुरक्षा ठेवी बाबत अन्य कोणत्याही न्यायालयापुढे अथवा मंचापुढे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे अशा बाबतचा उल्लेख नसल्याने या मंचाने तो तक्रार अर्ज, तक्रार प्रकरण ४२/०९ ने दाखल करुन घेवून, त्याप्रमाणे अंतरिम आदेशासाठी वि.प.स नोटीस देवून प्रकरण आज रोजी सुनावणीसाठी ठेवले.

वि.प.तर्फे आज रोजी तक्रार अर्जास म्हणणे दाखल केले व अर्जदाराची तक्रार व त्यावरील अंतरिम मनाई अर्जाला देखील विरोध दर्शविला आहे. सुरुवातीस त्यांचे म्हणणे असे की, अर्जदार कंपनीकडून वि.प.ने सुरक्षा ठेवीची रक्कम एप्रिल २००८ मध्ये मागणी केली होती. त्या बाबतचा अर्जदाराने सुरुवातीस जिल्हा ग्राहक मंचापुढे व तेथील प्रकरण काढून घेतल्यानंतर पुढे दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, सोलापूर यांचे कोर्टात स्पेशल मुकादमा क्र. २५५/०८ ने प्रकरण दाखल केले आहे व त्यामध्येही अंतरिम मनाई आदेश मागितला होता. तो अंतरिम मनाई आदेशाचा अर्ज न्यायालयाने फेटाळलेला आहे. मात्र मूळ दावा दिवाणी न्यायालय, सोलापूर येथे न्यायप्रविष्ट आहे. त्या दाव्यातील अर्जाची प्रत वि.प.तर्फे दिलेल्या म्हणण्यासोबत दाखल केलेली आहे.

या प्रकरणामध्ये अर्जदारातर्फे श्री. आबासाहेब कुलकर्णी व वि.प.तर्फे विधी सहाय्यक श्री. जवळकोटे यांचे म्हणणे या मंचाने ऐकले.

सुनावणी दरम्यान जेंव्हा अर्जदार कंपनीने या प्रकरणातील त्यांचा सुरक्षा ठेवीबाबतचे तक्रारीबाबत दिवाणी न्यायालयामध्ये दावा दाखल केला असल्याचे निदर्शनास, वि.प.ने आणून दिले तेंव्हा या मंचाने अर्जदार यांना अशी वस्तुस्थिती आहे काय ? या बाबत निवेदन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे अर्जदार कंपनीतर्फे प्रतिनिधींनी असे प्रकरण स्पेशन मुकादमा क्र. २५५/०८ ने अर्जदार कंपनीतर्फे सोलापूर कोर्टामध्ये दाखल केलेला आहे परंतु त्यामध्ये अंतरिम मनाई आदेश दिलेला नाही व तो अर्ज दि. ३०.३.२००९ रोजी न्यायालयाने ना मंजूर केला आहे असे लेखी निवेदन दिले आहे. तदनंतर पुढे त्यांचे म्हणणे की, त्यांच्या वकिलांनी कंपनीचा तो मूळ दावा क्र. २५५/०८ काढून घेण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या व त्यामुळे असा दावा न्यायालयात दाखल केलेला आहे, या बाबतचा उल्लेख अर्जदाराने या मंचाकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये केलेला नव्हता असे स्पष्टीकरण देण्यात आले.

या मंचाने वरील बाबींचा विचार करता, अर्जामध्ये अर्जदाराने दाखल केलेला मुकादमा क्र २५५/०८ या बाबतचा उल्लेख केला नाही व त्याबाबत मंचाची दिशाभूल केली हा मुद्दा जरी फार तांत्रिकदृष्ट्या विचार करण्यासारखा नसला, तरी देखील जेंव्हा या घटकेला असा दावा व त्या दाव्यामध्ये या अर्जदाराने निर्देशित केलेला सुरक्षा ठेवीबाबतचा समावेश आहे, असे असल्याने रेग्युलेशन २००६ मधील रेग्युलेशन नं. ६:७ (डी) या तरतुदींचा विचार करणे या मंचास आवश्यक वाटते.

परिणामी, रेग्युलेशन नं. ६:७ (डी) प्रमणे जेंव्हा तक्रारदार अर्जदाराने या मंचाकडे तक्रार करण्यापूर्वी अन्य कोर्टामध्ये अथवा न्यायाधिकरणापुढे अथवा लवादापुढे अथवा कोणत्याही संबंधित अधिकाऱ्यापुढे जर असे प्रकरण दाखल केले असेल तर त्याच प्रकरणाबाबतची सुनावणी या मंचास करण्याचा अधिकार पोहोचत नाही, असे दिसून येते. परिणामी, या प्रकरणातील तक्रार अर्जदाराचें जे कांही गाऱ्हाणे आहे त्या बाबतचा गुणवत्तेवर विचार करणे या मंचाचे अधिकारकक्षामध्ये येत नाही असे या मंचास वाटते. सबब या घटकेला सदरचा तक्रार अर्ज त्यातील कोणत्याही गाऱ्हाण्याचा गुणवत्तेवर विचार न करता फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रार अर्ज क्र. ४२/०९ हा रेग्युलेशन २००६ मधील रेग्यलेशन नं. ६:७ (डी) चे तरतुदीची बाधा येत असल्याने फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ०१.०७.२००९ (काकासाहेब य. जगताप)
अध्यक्ष

श्री. एस. आर. बांबळे, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :